# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 05.06.2025** **वार- शुक्रवार**

---

**<u>शांतीश्रीपंडित</u>**

भारत दहशतवादी हल्ले सहन करणार नाही; तर ऑपरेशन सिंदूरच्या माध्यमातून पहलगाम हल्ल्यासारख्या घटनांना चोख प्रत्युत्तर देईल, असं प्रतिपादन दिल्लीच्या जवाहरलाल नेहरू विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ शांतीश्री पंडित यांनी आज पुण्यात केलं. सैन्य अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या पदवी प्रदान समारंभात त्या बोलत होत्या. भारताने दहशतवादाविरोधात शून्य सहिष्णुता धोरण अवलंबलं आहे. ऑपरेशन सिंदूरमध्ये भारताच्या तीनही सैन्य दलांचा समन्वय दिसून आला. असं डॉक्टर पंडित म्हणाल्या. आपल्या भाषणात त्यांनी सैन्य दलातील शस्त्र आणि यंत्र सामुग्री, तंत्रज्ञान, देशांतर्गत उत्पादन, मेक इन इंडिया या उपक्रमाचं महत्त्व विषद केलं. आगामी काळात युद्धाचं स्वरूप आणखी बदलणार असून यामध्ये येणाऱ्या आव्हानांना सैन्य अभियांत्रिकी महाविद्यालयाचे विद्यार्थी सक्षमपणे सामोरे जातील, असा विश्वास पंडित यांनी व्यक्त केला. भाषणाच्या सुरुवातीला त्यांनी पहलगाम हल्ल्यातील मृतांना श्रद्धांजली अर्पण केली. या कार्यक्रमात ११ स्नातकांना एम टेक आणि २४ स्नातकांना बी टेक पदवी प्रदान करण्यात आली. एमटेक शाखेत लेफ्टनंट कर्नल धीरज परमार यांना सुवर्ण पदक तर बिटेक शाखेचं सुवर्ण पदक लेफ्टनंट प्रियांश मिश्रा यांना प्रदान करण्यात आलं. यावेळी महाविद्यालयाचे कमांडंट ए के रमेश, अधिष्ठाता ब्रिगेडियर रवी रेड्डी उपस्थित होते.

**कृषीविभाग**

खरीप हंगाम सुरू होत असतानाच बनावट बियाणे, खते आणि कीटकनाशकांची विक्री करणाऱ्या काही विक्रेत्यांविरुद्ध कृषी विभागाने कडक कारवाई सुरू केली आहे. पुणे जिल्ह्यातील १७ कृषी सेवा केंद्रांना तातडीने विक्री बंद करण्याचे आदेश देण्यात आले असून, शिरूर तालुक्यातील एका खासगी कंपनीवर बेकायदेशीर खतसाठा प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शेतकऱ्यांची फसवणूक होऊ नये, यासाठी जिल्हा कृषी विभागाने १५ भरारी पथकं तयार केली आहेत. शेतकऱ्यांनी केवळ अधिकृत परवानाधारक कृषी सेवा केंद्रांमधूनच खते, बियाणे आणि कीटकनाशके खरेदी करावीत, असं आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे यांनी आहे.

**एकझाडएकआशा**

जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने आज पुणे शहर आणि परिसरात अनेक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं; ठीकठिकाणी मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आलं. आमदार अमित गोरखे यांनी शालेय विद्यार्थ्यांसमवेत पर्यावरण दिन साजरा केला. यावेळी पर्यावरण जनजागृती आणि वृक्षारोपण उपक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या 'एक पेड माँ के नाम' या अभियानाचा संदर्भ देत अमित गोरखे यांनी विद्यार्थ्यांना त्यांच्या आईच्या सन्मानार्थ एक तरी झाड लावण्याचं आणि त्याचं संगोपन करण्याचं आवाहन केलं.

**पर्यावरणदिन**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त शिवसेनेच्या वतीने 'पर्यावरण जनजागृती दिंडी' चं आयोजन करण्यात आलं होतं. पुणे शहराच्या चारही बाजूंना असलेल्या डोंगररांगा आणि हिरव्यागार टेकड्यांचं सौंदर्य टिकवण्यासाठी पुणेकरांनी झाडं लावावीत आणि त्यांचं संगोपन करावं, असं आवाहन शिवसेनेचे पुणे महानगरप्रमुख रवींद्र धंगेकर यांनी यावेळी केलं.

**<u>शिवराज्याभिषेक</u>**

अखिल भारतीय शिव महोत्सव समिती, मराठा सेवा संघ आणि इतर शिवप्रेमी संघटनांच्या वतीने उद्या सकाळी पुण्यातील लाल महालात शिवराज्याभिषेक सोहळ्याचं आयोजन करण्यात आलं आहे. इथल्या व्यवस्थेचा बळी ठरलेल्याच्या कुटुंबीयांना निमंत्रित करून त्यांच्याच हस्ते हा शिवराज्याभिषेक सोहळा पार पडणार आहे. यामध्ये हुंडाबळी प्रकरणातील वैष्णवी हगवणे यांचे आई वडिल कसपटे कुटुंबीय, बीडच्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची मुलगी वैभवी देशमुख, पहलगाम हल्ल्यात शहीद झालेल्या जगदाळे आणि गणबोटे कुटुंबातील सदस्यांच्या समावेश आहे.

शिवराज्याभिषेक सोहळ्यात जलाभिषेक करण्यासाठी 12 मावळातील पवित्र नद्यांचं तसंच विविध गड किल्ल्यांवरील पाणी आणलं आहे.

**<u>मागणी</u>**

राज्य सरकारकडून पुणे महापालिकेत प्रतिनियुक्तीवर उपायुक्त पदावर काम करणाऱ्या अधिकाऱ्यांचा कालावधी पूर्ण झाला असून राज्य सरकारने त्यांनी बदली केली आहे. त्यामुळे त्यांना पुणे महापालिकेने कार्यमुक्त करावं, अशी मागणी माजी नगरसेवकांनी महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांच्याकडे केली आहे.

<u>Pcmc</u>

पिंपरी चिंचवड महापालिकेचे आयुक्त शेखर सिंग यांच्या नेतृत्वाखाली शहर उपजीविका कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. या अंतर्गत समाज विकास विभागाच्या प्रतिनिधींनी सर्वेक्षणाला सुरुवात केली आहे. शहरातील लोकसंख्येचं वयोमान, लिंग प्रमाण, कामगारांची संख्या, रोजगाराचे स्वरूप,

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक, दिव्यांग, तृतीयपंथीय, महिला वर्गाची सामाजिक आर्थिक स्थिती या बाबी जाणून घेण्यासाठी प्रातिनिधीक स्वरूपात सर्वेक्षणाला सुरुवात झाली आहे. पहिल्याच दिवशी ३५०हून अधिक नागरिकांचं सर्वेक्षण पूर्ण करण्यात आलं. पुढचे सहा दिवस हे सर्वेक्षण सुरू राहणार आहे.

हवामान

पुणे शहर आणि परिसरात आज कमाल ३३ आणि किमान २० पूर्णांक ९ दशांश अंश सेल्सियस तापमानाची नोंद करण्यात आली. आज शहर आणि परिसरात आकाश अंशतः ढगाळ आहे; उद्यादेखील ढगाळ हवामानासह हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या पावसाचा अंदाज हवामान खात्याने वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर संध्याकाळी 6 वाजता, ताज्या पुणे वृत्तांतासह, नमस्कार.**